# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

वित्त व लेखा विभाग
आय.एस.ओ.९००१-२०१५ युनिट

परिपत्रक

## सेवकांच्या नातेवाईकांकरिता विमा योजना

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, दि. ११ नोव्हेंबर, २००८ पासून शिक्षक व शिक्षकेतर सेवकांवर पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या अवलंबून असलेल्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना (Group Mediclaim Insurance Policy) राबविण्यात येत आहे. **पंधराव्या वर्षी (दि.११/११/२०१८) होणा-या नूतनीकरणापासून सेवकांच्या नातेवाईकांची संख्या ३ वरुन ५ (आई, वडील किंवा सासू सासरे, पती/पत्नी, सेवकांची जास्तीत जास्त दोन मुले ) करण्यात आलेली आहे.** विमा पॉलिसीचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.

१. सदर योजना विद्यापीठातील खाली नमूद केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना लागू राहिल.

- शासनमान्य.
- करारपध्दतीने नियमित वेतनश्रेणीत नियुक्त केलेले शिक्षक व शिक्षकेतर सेवक.
- युजीसी व इतर योजने अंतर्गत इ. एम. आर. सी., ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज आणि प्रगत संस्कृत अध्ययन केंद्र इत्यादी येथे कार्यरत असणारे सेवक.
- विद्यापीठाच्या शासनमान्य पदावर धारणाधिकार ठेवून विद्यापीठ फंडातून निर्माण केलेल्या पदावर रुजू झालेले सेवक.
- विद्यापीठ निधीतून एकत्रित वेतनावर
  १) जाहिरातीद्वारे नेमलेले सेवक.
  २) व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाद्वारे नेमणूक झालेले सेवक.
  ३) अनुकंपा तत्त्वावर हंगामी स्वरुपात नियुक्त केलेले सेवक.

२. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची कमाल मर्यादा रुपये ३ लाख आहे. सेवकांचा १०० टक्के विमा हप्ता विद्यापीठामार्फत भरला जातो व नातेवाईकांचा ५० टक्के विमा हप्ता विद्यापीठाकडून व ५० टक्के विमा हप्ता सेवकाच्या माहे डिसेंबरच्या पगारापासून तीन हप्त्यात वसूल करण्यात येईल.

३. सेवकांचे नातेवाईक यांचेकरिता सामुहिक वैद्यकीय विमा योजना यांचा समावेश असेल. वैयक्तिक अपघात योजनेअंतर्गत सेवकास अपघातमृत्यू (Accidental Death) अथवा कायमस्वरुपी संपूर्ण शारीरिक अपंगत्व (Physically permanent total disability) आल्यास एकूण रुपये तीन लाखापर्यंत विम्याची रक्कम मिळू शकते. यासाठी घटना घडल्यानंतर विमा कंपनीला ताबडतोब कळविणे आवश्यक आहे.

४. सदर पॉलिसीअंतर्गत रुग्णालयात दाखल झाल्यानंतर Non Mediclaim खर्च वगळता झालेला खर्च मिळेल. त्यानंतर रुग्णालयातून सोडल्यानंतर कमाल ६० दिवसांपर्यंतचा औषधोपचाराचा खर्च मिळेल.

५. सदर पॉलिसीमध्ये मॅटर्निटी व त्यासंबंधीत असणा-या तत्सम आजारांचा समावेश नाही.

६. पॉलिसीमध्ये नव्याने समाविष्ट होणा-या सेवक व त्यांचे नातेवाईक यांना अपघात वगळता पॉलिसीच्या तारखेपासून ३० दिवसांनंतर क्लेम करता येईल.

७. काही आजारांसाठी रुग्णालयात २४ तास दाखल होण्याची आवश्यकता नाही. इतर आजारांसाठी किमान २४ तास रुग्णालयामध्ये दाखल होण्याची आवश्यकता असते. पॉलिसीचे नूतनीकरण झाल्यावर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पॉलिसीची सविस्तर माहिती देण्यात येईल.

८. पॉलिसी अंतर्गत खालील खर्च समाविष्ट होणार नाहीत.
   अ) OPD औषधोपचाराचा खर्च.
   ब) केवळ वैद्यकिय तपासणीसाठी केलेल्या चाचण्यांचा खर्च.

९. सेवक किंवा सेवकाचे नातेवाईक विमा कंपनीने दिलेल्या यादीतील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाल्यानंतर पैसे न भरता (Cashless Facility मार्फत) औषधोपचार घेवू शकतात.

१०. सेवक किंवा सेवकाचे नातेवाईक विमा कंपनीने दिलेल्या यादीतील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले नसल्यास अशावेळी विमा कंपनीला ॲडमिट झाल्यापासून २४ तासाच्या आत ऑनलाईन इंटिमेशनद्वारे कळविणे आवश्यक आहे. तसेच डिस्चार्ज झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विमा कंपनीकडे क्लेम सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा याबाबतची पूर्तता न केल्यास विमा कंपनीने क्लेम नाकारल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सेवकावर राहील.

११. सेवकांवर पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या अवलंबून असलेल्या जास्तीत जास्त पाच नातेवाईकांना (आई, वडील **किंवा सासू सासरे**, पती/पत्नी, सेवकांची जास्तीत जास्त दोन मुले ) विमा पॉलिसी काढता येईल.

१२. ही पॉलिसी ३ महिने ते ८० वर्षेपर्यंत वयाच्या नातेवाईकांसाठी लागू राहील.

१३. सेवकांच्या मुलाचे वय २५ वर्षापुढील असल्यास व आर्थिकदृष्ट्या सेवकावर अवलंबून नसल्यास अशा मुलाची पॉलिसी काढता येणार नाही.

१४. सेवकांच्या मुलांचे वय २५ वर्षापुढील असल्यास तसेच मुलगा शिक्षण घेत असल्यास व आर्थिकदृष्ट्या सेवकावर अवलंबून असल्यास अशा मुलांची पॉलिसी काढता येईल.

१५. सेवकाची २५ वर्षापुढील अविवाहित मुलगी सेवकावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून असल्यास अशा मुलीची पॉलिसी काढता येईल.

१६. सदर विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक सेवकांनी आपल्या नातेवाईकांची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये भरून द्यावी.

१७. सेवकाने विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणा-या नातेवाईकांबाबतची माहिती खरी व वस्तुस्थितीस धरून देणे आवश्यक आहे (वय, आर्थिकदृष्ट्या अवलंबून असणे अथवा नसणे इ.). सदर माहिती वस्तुस्थितीस धरून नसल्यास, विमा कंपनीकडून क्लेम नाकारल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१८. पॉलिसीमध्ये सहभागी असणा-या सेवकांचे नातेवाईक वय अथवा आर्थिकदृष्ट्या अवलंबनाबाबत अट पूर्ण करीत नसल्यास, सदर नातेवाईक ही पॉलिसी धारण करण्यास अपात्र ठरेल. अशा प्रकारची माहिती सेवकाने स्वत:हून विद्यापीठास देणे बंधनकारक आहे.

१९. पॉलिसीमध्ये यापूर्वीच समावेश असलेल्या नातेवाईकांची नावे नूतनीकरण करण्यात येणार आहेत.

२०. ज्या सेवकांना विमा पॉलिसीमधील नातेवाईकांची नावे वगळून नवीन नातेवाईकांची नावे दाखल करावयाची असल्यास त्यांनी तसे लेखी स्वरुपात कळवावे.

२१. ज्या सेवकांना आपल्या नातेवाईकांची नावे रद्द करावयाची असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात कळवावे.

२२. दि ११ नोव्हेंबर, २०१७ पासून चालू असणा-या पॉलिसीमध्ये सेवकांचे २९०० नातेवाईकांचा समावेश आहे. त्यातील ज्या सेवकांचे पाल्य २५ वर्षापुढील आहेत अशा सेवकांनी स्वत:चा पाल्य पुढील शिक्षण घेत आहे तसेच अविवाहित मुलीच्या बाबतीत स्वत:वर अवलंबून असल्याबाबतचे हमी पत्र (सोबतच्या नमुन्याप्रमाणे) भरुन देणे आवश्यक आहे.

२३. सदर पॉलिसीचे दि. ११ नोव्हेंबर, २०१८ ला नूतनीकरण करण्यात येईल.

तरी आपण आपल्या नातेवाईकांची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये भरून दि. २९ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत वित्त व लेखा विभागात सादर करावी.

22/x/18

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/११८२
दिनांक : २२ ऑक्टोंबर, २०१८

**सीए (डॉ.) विद्या गारगोटे**
**वित्त व लेखा अधिकारी**
**अतिरिक्त कार्यभार**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. विभागप्रमुख, )
सर्व शैक्षणिक विभाग, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )
२. मा. शाखाप्रमुख, )
सर्व प्रशासकीय शाखा, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे.

दिनांक :    /    /२०१८

# हमीपत्र

प्रति,
वित्त व लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७

मी ______________________________ सेवक क्र. ______________

विभाग ______________________________ परिपत्रक दि. २२ ऑक्टोंबर, २०१८ नुसार नमूद केल्याप्रमाणे माझा पाल्य २५ वर्षापुढील असल्यामुळे हमीपत्र देत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राबवित असलेल्या सामुहिक वैद्यकीय विमा योजनेमध्ये माझ्या १/२ मुलांच्या नावाचा समावेश आहे / समावेश करावयाचा आहे.

१. मुलगा/ मुलगी ______________________________

वय : ____________

२. मुलगा/ मुलगी ______________________________

वय : ____________

माझे पाल्य शिक्षण घेत असल्यामुळे / मुलगी अविवाहित असल्यामुळे पूर्णपणे आर्थिकदृष्टया माझ्यावर अवलंबून आहे. भविष्यात मुलगा / मुलगी माझ्यावर आर्थिकदृष्टया अवलंबनाबाबत अट पूर्ण करीत नसल्यास स्वत:हून त्याचे / तिचे नाव पॉलिसीमधून कमी करण्यासाठी लेखी स्वरुपात कळविण्याची जबाबदारी माझी राहील. वरील माहितीमध्ये असत्यता निदर्शनास आल्यास सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.
(नको असलेला मजकूर खोडावा.)

**आपला / आपली विश्वासू,**

सेवकांच्या नातेवाईकांकरिता विमा योजना

माझे नातेवाईक सदर विमा योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छितात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सेवकाचे नाव : मराठी ______________________________

: English ______________________________

सेवक क्रमांक : ______________________________

विभाग : ______________________________

दूरध्वनी क्रमांक : ______________________________

**नातेवाईकाचे नाव (१) : मराठी** ______________________________

**: English** ______________________________

**जन्मतारीख व वय :** ______________________________

**स्त्री/पुरुष :** ______________________________

**सेवकाशी नाते :** ______________________________

**नातेवाईकाचे नाव (२) : मराठी** ______________________________

**: English** ______________________________

**जन्मतारीख व वय :** ______________________________

**स्त्री/पुरुष :** ______________________________

**सेवकाशी नाते :** ______________________________

**नातेवाईकाचे नाव (३) : मराठी** ______________________________

**: English** ______________________________

**जन्मतारीख व वय :** ______________________________

**स्त्री/पुरुष :** ______________________________

**सेवकाशी नाते :** ______________________________

नातेवाईकाचे नाव (४) : मराठी ____________________

: English ____________________

जन्मतारीख व वय : ____________________

स्त्री/पुरुष : ____________________

सेवकाशी नाते : ____________________

नातेवाईकाचे नाव (५) : मराठी ____________________

: English ____________________

जन्मतारीख व वय : ____________________

स्त्री/पुरुष : ____________________

सेवकाशी नाते : ____________________

सेवकाची सही :